# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३

## (सकाळी १०-०० ते ११-४५ वाजेपर्यंत)

**राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर —**

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**(क) तारांकित प्रश्न.**

**(ख) सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**(१) मुख्यमंत्री :**

**(क)** "महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी लिमिटेड यांचा सन २०१९-२०२० व सन २०२० २०२१ या वर्षाचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड यांचा सन २०१९- २०२० व २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहसमोर ठेवतील.

**(२) उच्च व तंत्र शिक्षण व वस्त्रोद्योग मंत्री :**

**(क)** "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे" (अंकेक्षण अहवालासह) सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

**(ग)** "सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे, यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे आणि संविधानिक लेखापरीक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक लेखे आणि अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** "महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल आणि वित्तीय पत्रके" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : शोक प्रस्ताव :-**

**"श्री. दिवाकर बळवंत पांडे, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव."**

**चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**पाच : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ व बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत निर्माण झालेले गंभीर प्रश्न, मराठा समाजास आरक्षणापासून वंचित रहावे लागण्यासारखी निर्माण झालेली स्थिती, त्यामुळे राज्यात अनेक भागात आरक्षण समर्थनार्थ दीर्घ काळापासून सुरु झालेली तीव्र स्वरुपाची आंदोलने, काही ठिकाणी आंदोलनास लागलेले हिंसक वळण, अद्यापही आंदोलने सुरु असणे, यात तोडगा न निघाल्यास परिस्थिती

स्फोटक होण्याचा निर्माण होणारा धोका, राज्य शासनाने केलेल्या कायद्याची अंमलबजावणी सुरु रहावी व मराठा समाजास आरक्षण मिळावे यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज, तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणाप्रमाणे मराठा समाजाच्या आरक्षणाला केंद्र शासनाने घटनात्मक संरक्षण देण्याची कार्यवाही करावी, यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही मागणी करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"वरळी, मुंबई येथील गांधीनगर परिसरात निर्माणाधीन असलेल्या इमारतीच्या ४२ व्या मजल्यावरून मोठ्या आकाराची वीट पडल्याने रस्त्याने जाणाऱ्या दोघा पादचाऱ्यांचा नाहक मृत्यू झाला असल्याची दुर्दैवी घटना दिनांक १४ फेब्रुवारी, २०२३ रोजी घडली असणे, या दुर्घटनेत मृत झालेल्या व्यक्ती एका एक्स्पोर्ट कंपनीत कामाला असणे, वरळीच्या गांधीनगर परिसरात 'फोर सीझन' हॉटेलच्या नव्या इमारतीचे बांधकाम सुरू असणे, या निर्माणाधीन इमारतीच्या ४२ व्या मजल्यावरून मोठ्या आकाराची वीट खाली कोसळलेली असणे, या दुर्घटनेत गंभीर जखमी झालेल्या दोनही पादचाऱ्यांना तब्बल अर्धा तास रस्त्यावर उपचाराविना पडून राहावे लागणे, 'गोल्डन अवर' मध्ये त्यांना वैद्यकीय मदत सहाय्यता देण्यात संबंधित विकासकाच्या व्यवस्थापनाने अक्षम्य हलगर्जीपणा केलेला असणे, अखेर त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला असणे, या दुर्घटनेत काही वाहनांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असणे, इमारतीच्या ४२ व्या मजल्यावरून मोठी वीट पडल्याने विकासकाकडून करण्यात आलेल्या सुरक्षाविषयक उपाययोजनांबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, तसेच निर्माणाधीन इमारतीतील अनेक अनियमिततेकडे शासकीय यंत्रणेने हेतुपुरस्सर केलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदरहू दुर्घटनेत विकासक आणि त्याच्या कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे दोघांना नाहक प्राण गमवावे लागले असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण, भविष्यात संबधित विकासकाच्या बेपर्वा वर्तणूकीमुळे अशाच प्रकारची दुर्घटना घडून अन्य नागरिकांना देखील जीव गमवावा लागण्याची असलेली दाट शक्यता, परंतु याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष आणि संबधित विकासकाच्या अनधिकृत कृत्यास शासनाकडून देण्यात येत असलेले अभय, परिणामी, सर्वसामान्य जनतेत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची आणि संतापाची भावना, यास्तव सदरहू दुर्घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

अग्रिम प्रत

(३) **श्री.प्रसाद लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ग्रामीण भागातून शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना राहण्याची चांगली व्यवस्था होण्यासाठी शासनाने शासकीय वसतीगृह उभारले असून मुंबईतील चेंबूर नाका परिसरात १ हजार विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह बांधण्याचा निर्णय सन २००७ मध्ये घेणे, परंतु वसतीगृहाचे बांधकाम अद्यापपर्यंत पूर्ण झालेले नसणे, खाजगी विकासकाने सदर वसतीगृहाचे काम अर्धवट सोडल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना भाड्याने शिक्षणासाठी राहावे लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात आढळून येणे, शासकीय वसतीगृहाचे काम गेल्या १६ वर्षांपासून रखडले असल्यामुळे राज्य शासनाने लक्ष घालून सदर प्रकरणी तात्काळ वसतीगृहाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी चेंबूर येथे शेकडो विद्यार्थ्यांनी माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात आंदोलन सुरू करणे, त्यामुळे शासनाने याची सखोल चौकशी करून तातडीने शासकीय वसतीगृह उभारण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री शशिकांत शिंदे,** विक्रम काळे, अमोल मिटकरी, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सातारा जिल्ह्यातील कोरेगांव तालुक्यातील मौजे तडवळे स. वाघोली येथील गट क्र. ६४/१ या ठिकाणी अवैध पध्दतीने स्टोन क्रशर सुरु असून मंडळाची संमती न घेता हे स्टोन क्रशर चालविले जात असणे, हे क्रशर चालू करतांना पुढील निकष आवश्यक असतांना १) सदर स्टोन क्रशर निरा- सातारा राज्य महामार्गापासून सुमारे २२० मीटर अंतरावर असून बोर्डाचे दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२० च्या परिपत्रकानुसार अंतराचे निकष पूर्ण करु शकत नाही. २) कन्व्हेअर बेल्ट शीटने झाकलेले नाही त्यावर पाणी शिंपडण्याची व्यवस्था करण्यात आलेली नाही. ३) क्रशरच्या परिघाभोवती वारा तोडणारी भिंत करण्यात आलेली नाही. ४) वाहनांच्या हालचालीतून निर्माण होणाऱ्या धुळीच्या उत्सर्जनावर नियंत्रण ठेवणेसाठी कोणतीही सुविधा करण्यात आलेली नाही. ५) सदर क्रशरच्या ठिकाणी पुरेसे वृक्षारोपण करण्यात आलेले नाही. ६) सदरच्या स्टोन क्रशरकडून (मालकाकडून) जल प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, १९७४, वायू प्रतिबंध नियंत्रण अधिनियम, १९८१ च्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष केले असणे, अशा प्रकारे अवैध स्टोन क्रशर चालवून क्रशरच्या मालकाने शासनाचे नुकसान केलेले असणे, यासंदर्भात चौकशी करुन संबंधित स्टोन क्रशर मालकाविरुध्द कारवाई करण्याबाबत होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

अप्रकाशित प्रत

**(५)** **श्री.सत्यजित तांबे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात मागील १० वर्षांमध्ये बाहेरच्या राज्यांमधून अथवा परदेशातून अनेक नवनवीन उद्योग व गुंतवणूक येणे, परंतू वारंवार हे उद्योग काही ठराविक औद्योगिक वसाहतींमध्ये आल्यामुळे त्याच औद्योगिक वसाहतींचा किंवा त्याच्या आजूबाजूच्या ठराविक शहरांचाच विकास होणे, (उदाहरणार्थ मुंबई, ठाणे, नागपूर, पुणे, औरंगाबाद) परिणामी राज्यातील इतर शहरांमध्ये व तालुका पातळीवरील औद्योगिक वसाहतीमध्ये विकासाचा समतोल न साधल्यामुळे या औद्योगिक वसाहतीतील परिसरातील उद्योजकांना कुठल्याही सोई सुविधा उपलब्ध न होणे, परिणामी तेथील उद्योजक सुशिक्षित बेरोजगार व युवक-युवती यांच्यामध्ये उदासीनता पसरणे, त्यामुळे राज्याच्या सर्व भागामधून बेरोजगार तरुण युवक युवतींना राज्यातील ठराविक भागामध्येच स्थलांतर होऊन त्या स्थलांतरामुळे नागरी विकासावर देखील ताण पडणे, त्यासाठी शासनाने राज्यातील मागील १० वर्षात औद्योगिक वसाहतीनुसार आकडेवारीची माहिती घेऊन शासनाने करावयाची कार्यवाही, तसेच विकासाचा समतोल साधला जावा, राज्यात येणारे नवे उद्योग व गुंतवणुक सर्वत्र जाण्याच्या दृष्टीने शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही करून धोरणात्मक निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."

**सहा : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

## - मध्यंतर -

**सात : सन २०२२-२०२३ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा – (दुसरा व शेवटचा दिवस)**

**खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

**१)** मुख्यमंत्री.

**२)** उप मुख्यमंत्री.

**३)** महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री.

**४)** वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री.

**५)** उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री.

**६)** आदिवासी विकास मंत्री.

**७)** ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री.

**८)** पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री.

अग्रिम प्रत

९) कामगार मंत्री.

१०) उद्योग मंत्री.

११) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री.

१२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री.

१३) कृषी मंत्री.

१४) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री.

१५) सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री.

१६) राज्य उत्पादन शुल्क मंत्री.

१७) पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महिला व बालविकास मंत्री.

**आठ : शासकीय विधेयके —**

**(क) विधानसभेने संमत केल्यास — विधेयक विचारात घेणे :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२३"

---

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार पुढे सुरु, खंडशः विचार व संमत करणे.**

(१) "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ — महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) विधेयक, २०२२"

---

(२) "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२."

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

अप्रकाशित प्रत

**(ग) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ — महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३"

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ — महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ — महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ —डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ — डॉ.बाबासाहेब

अप्रकाशित

आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

नऊ : (क) **(मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३, बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३ व गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) –**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** सुरेश धस, प्रा.राम शिंदे, सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रसाद लाड, रणजितसिंह मोहिते-पाटील, निलय नाईक, रामदास आंबटकर, रमेश कराड, प्रविण दटके, गोपिचंद पडळकर, श्रीकांत भारतीय, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री विजय उर्फ भाई गिरकर, महादेव जानकर, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री रमेशदादा पाटील, रामराव पाटील, प्रविण पोटे-पाटील, वसंत खंडेलवाल, अमरीशभाई पटेल, ज्ञानेश्वर म्हात्रे, राजहंस सिंह, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"मागील सरकारच्या कार्यकाळात, शेतकरी बांधवाच्या समस्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी मागील सरकारने एक वर्षात केवळ रु.६००० कोटी वितरित केलेले असतांना महायुती सरकारने रु.१२००० कोटी केवळ ७ महिन्यांच्या कालावधीत वितरीत करून मागील सरकारच्या कार्यकाळात शेतकरी बांधवांवर झालेला अन्याय दूर करणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीचे निकष महायुती सरकारने दिड पटीने वाढवून शेतकऱ्यांना अगोदरच्या मानकांपेक्षा अतिरिक्त मदत मिळेल याची काळजी घेणे, सत्तेवर येताच मागील सरकारने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेची अंमलबजावणी थांबविणे व त्याच वेळेस नियमितपणे कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना रु. ५०,०००/- इतके प्रोत्साहन देण्याची घोषणा मागील सरकारने सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या दोन्हीही अर्थसंकल्पीय भाषणात करूनही प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना दिरंगाई करणे, परंतु शेतकरी हित लक्षात घेवून महायुती सरकारने सत्तेवर येताच शेतकरी बांधवाना प्रोत्साहनपर रु. ५०,०००/- देण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करून प्रत्यक्ष मात्र शेतकरी बांधवाच्या खात्यात आजपर्यंत रु. ४७०० कोटी जमा करण्यात येणे, विदर्भ, मराठवाडा व खान्देशासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सातत्याने सत्तेवर असूनही मागील सरकारने कायमस्वरूपी सोडविण्याचा कधीही प्रयत्न

न करणे परंतू, त्याच वेळेस महायुती सरकारने माहे जून, २०१९ मध्ये वैनगंगा-नळगंगा नदी जोडप्रकल्प, कोकणात वाहून जाणाऱ्या १८७ अब्ज घनफुट पाणी मराठवाडा व खान्देशात वळविण्याची घोषणा करणे परंतू, मागील सरकारने ३२ महिन्याच्या कार्यकाळात या शेतकरी हिताच्या प्रकल्पांकडे दुर्लक्ष करणे, नव्याने सत्तेवर येताच गत अधिवेशनात विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची सिंचनाची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी वैनगंगा-नळगंगा ते पैनगंगा प्रकल्पास मान्यता देणे, कृष्णा-भिमा-मराठवाडा स्थिरीकरण प्रकल्पासही मान्यता देणे, तसेच समुद्रात वाहून जाणाऱ्या १८७ टीएमसी पाणी मराठवाडा, खान्देशाकडे वळविण्याच्या प्रकल्पास गती देण्यात येणे, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी केंद्र शासनाने मंजूर केलेला बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प मागील सरकारकडून दुर्लक्षित होणे, शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाच्या असणाऱ्या प्रकल्पास महायुती सरकारने सत्तेवर येताच गती देणे, मागील सरकारच्या ३२ महिन्याच्या कार्यकाळात केवळ १४ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे परंतू, महायुती सरकारने केवळ ६ महिन्याच्या कार्यकाळात २३ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे, या प्रकल्पांच्या माध्यमातून ५,२१,६५१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येवून त्याचा फायदा लाखो शेतकऱ्यांना होणे, जलयुक्त शिवार योजनेचा टप्पा २ नव्याने कार्यान्वित करुन शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे विद्यमान शासनाचे प्रयोजन शेतकरी बांधवांच्या शेतीकरीता दिवसा वीज पुरवठा करण्याची मागणी आघाडी सरकारकडून सातत्याने दुर्लक्षित होणे परंतु, महायुती सरकारने हा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेद्वारे शेती पंपाकरीता दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी तातडीने प्रयत्न सुरू करणे, मागील सरकारच्या कार्यकाळात कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना उभे राहण्याची मुभा नसणे परंतु, महायुती सरकारने शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजारसमितीमध्ये प्रतिनिधित्व मिळावे या उदात्त हेतूने कायद्यामध्ये आवश्यक ते बदल करणे, राज्यात ग्रामीण आरोग्य विभागांतर्गत हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजना सुरु करुन जिल्ह्या-जिल्ह्यांत आरोग्य सुविधा सहज उपलब्ध करण्याचे विद्यमान शासनाचे धोरण, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये व्यापाऱ्यांसाठी मोठे गाळे बांधत असतांना शेतकऱ्यांसाठी साधी राहण्याची सोयही वर्षानुवर्ष उपलब्ध नसणे, ही बाब लक्षात घेवून प्रत्येक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एक शेतकरी भवन स्थापन करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(ख) **(गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** —

**सर्वश्री अंबादास दानवे**, एकनाथराव खडसे, सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, जयंत पाटील, विलास पोतनीस, विक्रम काळे, अभिजीत वंजारी, सचिन अहिर, अमोल मिटकरी, राजेश राठोड, नरेंद्र दराडे, सतीश चव्हाण, वजाहत मिर्झा, अनिकेत तटकरे, जयंत आसगावकर, सुधाकर अडबाले, धिरज लिंगाडे, कपिल पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** —

"राज्यातील शेतकरी प्रचंड अडचणीत आला असणे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (पाणलोट विकास) टप्पा-२ मध्ये केंद्र शासनाकडून राज्याला मिळालेल्या निधीमधून १ टक्काही रक्कम राज्याने खर्च केली नसल्यामुळे संपूर्ण रक्कम केंद्र सरकारला परत करण्याची नामुष्की राज्यावर आली असणे, शासकीय सेवकांच्या बदल्यांबाबतचा सुस्पष्ट कायदा असताना कृषी मंत्री यांनी वर्ग ३ कर्मचाऱ्यांच्या बदल्या संदर्भात स्वतंत्र आदेश काढणे, भरती व पदोन्नतीबाबत शासनाची मान्यता घेण्याचा तुघलकी आदेश काढला असणे, राष्ट्रीय कृषी विकास योजना, पीक विमा योजना, बाजार हस्तक्षेप योजना आणि मूल्य समर्थन योजना निधीसारख्या योजनांच्या तरतुदी सातत्याने कमी केल्या जात असल्यामुळे शेतकऱ्याच्या उत्पन्नात लक्षणीय घट होऊन त्याचा कृषी उत्पादनावरही विपरीत परिणाम होत असणे, पंतप्रधान कृषी सिंचन योजनेतून शेतकऱ्यांना तुषार आणि ठिबक सिंचनासाठी असलेले अनुदान वाटप अनेक शेतकऱ्यांना झालेले नसणे, "ग्रॉस डोमेस्टिक क्लायमेट रिस्क" या संस्थेने हवामान बदलाचा धोका असलेल्या देशातील प्रसिध्द केलेल्या १०० राज्यांच्या यादीत महाराष्ट्राचाही समावेश असणे, सदरहू धोका लक्षात घेऊन उपाययोजना सुचविण्यासाठी दोन्ही सभागृहाची एक संयुक्त समिती गठीत करण्याची आवश्यकता, महागाईचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला असून शेतीमालाचे दर घसरले असणे, खते, कीटकनाशके, तणनाशके, बियाणे यांच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने शेतकरी मेटाकुटीला आला असणे, ज्वारीवर मावा तसेच तुडतुडे (डेल्फसीड) रोगाचा प्रादुर्भाव झाला असणे, तृणधान्याच्या प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी धडक कार्यक्रम राबवून ठोस तरतूद करण्याची आवश्यकता, केंद्र, राज्याकडून सोयाबीन, कापूस, कांदा, द्राक्ष, हरभरा उत्पादकांची फसवणूक झाल्यामुळे शेतकरी रस्त्यावर आला असणे, सदरहू शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी सरकारकडून

असुधारित प्रत

शेतकऱ्यांवर लाठीचार्ज करण्यात आला असणे, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत पात्र ठरुनही अद्याप हजारो शेतकरी लाभापासून वंचित राहिले असणे, सरकारच्या निष्क्रियतेमुळे पीक कर्ज देण्यासाठी बँक जाणीवपुर्वक विलंब करीत असून सिबील सक्ती अद्याप कायम असणे, प्रोत्साहन अनुदान योजनेचा लाभ हजारो शेतकऱ्यांना मिळाला नसणे, सहकारी संस्थाच्या नोंदणीत सरकारच्या हस्तक्षेपामुळे सहकारी संस्थांपुढे निर्माण झालेला प्रश्न, राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना केंद्र सरकारच्या एनसीडीसी संस्थेकडून देण्यात येणाऱ्या कर्जामध्ये पक्षपातीपणा झाला असणे, सातबारा उताऱ्यावरील पीकपेरा नोंदी अभावी पालघर जिल्ह्यातील विक्रीअभावी पडून राहिलेल्या भात उत्पादकांना दिलासा देण्याची आवश्यकता, कांद्याचे दर सातत्याने घसरत असल्यामुळे कांदा उत्पादक हवालदिल झाला असणे, नाफेड मार्फत कांदा खरेदी निर्णय तातडीने घेण्याची आवश्यकता तसेच राज्यसरकारने स्वतःच्या तिजोरीतून भावांतर योजना सुरु करण्याची आवश्यकता, हमीभाव केंद्रावर धान विकणाऱ्या शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादित प्रति हेक्टरी १५ हजार रुपये बोनस देण्याच्या हिवाळी अधिवेशनात केलेल्या घोषणा पूर्णपणे अपयशी ठरणे, महाराष्ट्र विद्युत वितरण महामंडळाकडून सातत्याने शेतकऱ्यांची वीज तोडली जात असणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, तसेच ज्या गावांतून थकीत बिलाची रक्कम वसूल केली जाते त्या गावाच्या विकासकामांसाठी एकूण वसूल केलेल्या रकमेच्या ३० टक्के रक्कम विद्युत महामंडळाकडून देणे आवश्यक असताना त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, तसेच साहित्यांचा होत असलेल्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे वीज जोडणी साठी होत असलेला विलंब, सिंगल फेजची नागरीकांकडून मोठ्याप्रमाणात मागणी होत असून त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, तसेच जुन्या डी.पी मुळे वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे होत असलेले नुकसान, अतिवृष्टीची मदतही अद्याप सर्व पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नसणे, तसेच अतिवृष्टीमुळे रस्ते व पुलांचे नुकसान झालेले असणे, तसेच जनावरांचा देखील मृत्यू झाला असणे, उक्त नुकसानीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून नागरीकांना अजून कोणतीही मदत मिळाली नसणे, केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून रोजगार हमी योजना राबविण्यासाठी कडक निर्णय घेण्यात आल्यामुळे रस्ते दुरुस्ती करण्याच्या कामामध्ये अडचणी येत असने, त्यामुळे उक्त योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांवर ग्रामसेवकांनी बहिष्कार घातला असणे, तसेच मनरेगा योजनेमध्ये महाराष्ट्र राज्य पिछाडीवर गेला असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

अग्रिम प्रत

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**दहा : (क) अशासकीय विधेयके :-**

**पुर:स्थापनार्थ —**

(१) "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक १ — महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती, जाहिरात-फलक लावण्यास, समाज माध्यमांवर व संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०२३" — श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.

(२) "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक २ — महाराष्ट्र अल्पभूधारक शेतकरी यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०२३" — श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.

(३) "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ३ — महाराष्ट्र राज्यातील युवक-युवतींना बेरोजगारी भत्ता विधेयक, २०२३" — श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.

**(ख) अशासकीय ठराव :-**

**(मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत) —**

**(१) श्री.राजेश राठोड, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २५**

"शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशक यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे".

अमुद्रित प्रत

**(२) डॉ.वजाहत मिर्झा, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ३७**

"राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांना शिक्षण व रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्याने हा समाज विकासापासून वंचित आहे, राज्य शासनाच्या अनेक योजना या समाजापर्यंत पोहोचत नसल्याने या समाजाला अनेक लाभ मिळत नाहीत, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ हे फक्त नावापुरते उरलेले आहे, या महामंडळाद्वारे एकाही ठिकाणी एकही व्यवसायिक व थेट कर्ज पूर्ण करण्यात आले नाही, मागील तीन वर्षांपासून या महामंडळाची कार्यकारणी सुद्धा घोषित केली नसून शासनाकडून या महामंडळास निधीही उपलब्ध करून दिला जात नाही, तसेच या समाजातील हजारो विद्यार्थ्यांना अनेक वर्षांपासून शिष्यवृत्ती देखील मिळत नाही, शाळांना योग्य अनुदान देखील मिळत नसल्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात देखील अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी मागास राहत आहेत, यामुळे या समाजातील नागरिकांच्या आर्थिक व शैक्षणिक मागासलेपणामध्ये वाढ होऊन हा समाज विकासापासून दूरच राहिला आहे, या समाजाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उत्कर्षासाठी शासनाने अधिकाधिक प्रभावी उपाययोजना आखाव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(३) श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २०**

"विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प आहेत, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असून त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर भारनियमन होते, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगात होणारे आर्थिक नुकसान, विदर्भातील वीज इतरत्र जात असतानासुध्दा विदर्भातील वीज ग्राहकांकडून वीज हानीच्या नावाने पैसा वसूल करण्यात येतो, वीजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहणे यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे होणारे प्रचंड नुकसान, विजेअभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे, विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन देखील तेथील विकास होत नाही, विदर्भात उत्पादीत उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची नितांत गरज लक्षात घेता विदर्भातील भारनियमन रद्द करण्याच्या

अप्रकाशित प्रत

दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २ मार्च, २०२३

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

अस्थायी प्रत